पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-पुणे-४११०१८
मध्यवर्ती भांडार विभाग
Email-store@pcmcindia.gov.in Website- pcmcindia.gov.in
फोन नं६७३३३३३३-०२० : विस्तारीत क्रमांक१५३५:

जा.क्र.मभां/०४/कावि/१३४३/२०२० दि. १४/१२/२०२०

**विषय :- निरूपयोगी भंगार नादुरूस्त व दुरूस्त न होण्याजोगे साहित्याची विल्हेवाट लावणेबाबत......**

**परिपत्रक,**

२/- पिपंरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागाकडे उपलब्ध असलेल्या निरूपयोगी/भंगार साहित्य नेहरूनगर येथे एकत्रित करून लिलावाव्दारे विक्री करणेत येते. अपवादात्मक परिस्थितीमध्ये अवजड व मोठया प्रमाणत असलेले निरूपयोगी साहित्य हे संबधित विभागाकडे ठेवुन असे साहित्य हे लिलावाव्दारे विक्री करणेत येते.

मनपाच्या विविध विभागाकडील निरूपयोगी/भंगार साहित्य हे नेहरूनगर गोडावुन येथे जमा करीत असताना विभागांसाठी वाहतुक खर्च,मनुष्यबळ,वेळेचा अपव्य इ.कारणासाठी खर्च करावा लागतो.सबब सदरची बाबी टाळणेसाठी भंगार निरूपयोगी साहित्य आहे त्याच ठिकाणी गटवारी/वर्गवारी करून ठेवुन अशा निरूपयोगी/भंगार साहित्याची विल्हेवाट लावण्याचे विचाराधीन आहे.

त्या अनुषंगाने या परीपत्रकान्वयें सर्व क्षेत्रिय अधिकारी / विभागप्रमुख यांना सुचित करण्यात येते की, सर्व क्षेत्रिय कार्यालये,यांनी त्यांचे अखत्यारीतील विभाग उपविभाग यांचेकडील भंगार निरूपयोगी साहीत्य हे वर्गवारी/गटवारी करून उपलब्ध जागेत साठवणुक करून ठेवावे. तसेच विभागस्तरावर साहित्य निर्लेखन समिती गठित करून वापरावयास अयोग्य साहित्य निर्लेखन करावे .मात्र असे करत असताना जे निरूपयोगी/भंगार साहित्य किरकोळ दुरूस्ती नंतर वापरात येवु शकेल असे साहित्य औद्योगिक प्रशिक्षण केंद्र,मोरवाडी,/ कासारवाडी यांचेकडुन दुरूस्त करून घ्यावे किंवा आपले विभागाकडील स्थायी अग्रिमधनातून वापरायोग्य साहित्याच्या दुरूस्तीसाठी खर्च करावा. निरूपयोगी/भंगार साहित्य विल्हेवाट लावताना परीपत्रक क्र.मभां/१२/कावि/२५८/२०१९ दि.०८/०८/२०१९ अन्वयें कळविलेनुसार मार्गदर्शक सुचनांचे काटेकोरपणे पालन करून कार्यवाही करावी.

**वापरास अयोग्य निरूपयोगी/भंगार साहित्याचे निर्लेखन झालेनंतर अशासाहित्याची यादी मध्यवर्ती भांडार विभागाकडे परिशिष्ठ "अ" मध्ये दि.३१/१२/२०२० पर्यंत सादर करण्यात यावी.** सदर यादीचा समावेश लिलावाव्दारे विक्री करावयाच्या निरूपयोगी/भंगार साहित्याच्या यादीमध्ये समावेश न झाल्यास त्यास सर्वस्वी क्षेत्रिय अधिकारी / विभागप्रमुख जबाबदार राहतील याची गांभिर्यपूर्वक दखल घेणेत यावी.

आपल्या अखत्यारीत असलेले निरूपयोगी/भंगार साहित्य लिलावाकामी यादी न देता निरूपयोगी/भंगार साहित्य आपले विभागातच पडुन असल्याचे निदर्शनास आल्यास क्षेत्रिय अधिकारी / विभागप्रमुख यांना जबाबदार धरण्यात येईल याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

सही/-

**अति.आयुक्त,(२)**
पिपंरी चिचवड महानगरपालिका
पिंपरी पुणे -१८

## परिशिष्ठ “अ”

## पिपंरी चिचवड महानगरपालिका,पिंपरी, पुणे. -४११०१८

**विभाग:-**

### :-निरूपयोगी/भंगार नादुरूस्त, साहित्याचा माहितीचा तक्ता:-

| अ.क्र. | साहित्याचा संक्षिप्त तपशिल उदा. | स्वरूप | अंदाजे परीमाण/लॉट/नग/संख्या | साहित्य उपलब्ध असलेले ठिकाण | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १.<br>२.<br>३.<br>४.<br><br><br>५.<br><br>६.<br><br>७.<br><br>८.<br><br>९.<br>१०.<br>११.<br>१२.<br><br>१३.<br><br>१४.<br>१५.<br>१६.<br><br>१७. | लोखंड<br>लाकुड<br>लोखडी फर्निचर<br>लाकडी फर्निचर<br>उदा. (टेबल, बेंच, कपाट इ .)<br><br>ॲल्युमिनियम(खिडकी,ग्रील,दरवाजे )<br>जी.आय.शिट (पत्रा)<br>पाईप जी.आय.,लोखंडी.इत्यादी.)<br>विद्युत साहीत्य-केबल्स,<br>फिटींग,चोक,ईनेटर,वायर्स बल्ब इ.<br>किरकोळ भंगार<br>कच-याचे लोखंडी कंन्टेनर<br>कचरा ढकलगाडी<br>टायर/टयुब<br>वाहनांची बॅटरी<br>ऑईल रिकामे बॅरल<br>ना दुरूस्त मशिनरी<br>उपकरणे<br>भंगार प्लास्टीक खेळणी<br>पेपर रददी<br>ना दुरूस्त संगणक भंगार<br>साहित्य(प्रिंटर,मॉनिटर,कि-बोर्ड-माउस,इ. किरकोळ भंगार )<br>अतिक्रमण विभागाचे जप्त केलेले साहित्य उदा.लोखंडी टप-या हातगाडी,वाहने इतर किरकोळ साहित्य | | | | |

निरूपयोगी/भंगार नादुस्त,दुरूस्त न होण्याजोगे साहीत्य गटवारी /वर्गवारी करून एकत्रित ठेवणेत यावे.

क्षेत्रिय अधिकारी / विभागप्रमुख
पिपंरी चिचवड महानगरपालिका
पिंपरी पुणे -१८